“समाजकार्य महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्व विकासात क्षेत्रकार्याची भूमिका”

विशेष संदर्भ:— स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ परिक्षेत्रातील समाजकार्य महाविद्यालये.

स्वामी रामानंद तीर्थ
मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड आंतरविद्याशाखे अंतर्गत समाजकार्य विषयाच्या विद्यावाचस्पती (पीएच.डी.) पदवीसाठी सादर करावयाच्या शोधप्रबंधाची रूपरेषा

संशोधक

शिरसे बुध्दभुषण माधवराव

एम.एस.डब्ल्यु., एम.फिल., सेट (SET)

जवाहरलाल नेहरू समाजकार्य महाविद्यालय व संशोधन केंद्र, सिडको, नविन नांदेड.

मार्गदर्शक

डॉ. शेख आसिफोद्दिन ऐनोद्दिन

सहाय्यक प्राध्यापक

बि.एच.एम.एस., एम.एस.डब्ल्यु., पीएच.डी., सेट, (SET) नेट, (NET)

जवाहरलाल नेहरू समाजकार्य महाविद्यालय व संशोधन केंद्र, सिडको, नविन नांदेड.

संशोधन केंद्र

जवाहरलाल नेहरू समाजकार्य महाविद्यालय व संशोधन केंद्र,
सिडको, नविन नांदेड.

(फेब्रुवारी २०२२)

“समाजकार्य महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्व विकासात क्षेत्रकार्याची भूमिका”

विशेष संदर्भः— स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ परिक्षेत्रातील समाजकार्य महाविद्यालये.

प्रस्तावणा :

भारतात व्यावसायिक समाजकार्य शिक्षणाची सुरूवात सर्व प्रथम १९३६ मध्ये सर दोराबजी टाटा यांनी देवनार,मुंबई येथे टाटा समाज विज्ञान संस्थेच्या स्थापनेने झाली. आज भारतात व्यावसायिक समाजकार्याने ८० वर्ष पेक्षाही जास्त काळ पूर्ण केला आहे. भारतात समाजकार्य महाविद्यालयाच्या विकास हा जलद गतीने नसला तरी तो सातत्याने चालू आहे. भारतात समाजकार्य प्राचीन काळापासुन समाज सेवेच्या माध्यमातुन (दान, धर्म, परोपकार व सेवा) दिसुन येतो.

भारतात १९५७ साली केवळ ९ समाजकार्याची महाविद्यालय होते. त्यानंतर १९७५ ला ही संख्या ३४ एवढी झाली. १९८० दशकात ४५ त्यानंतर पुढील १० वर्षात ६१ आणि आज ही संख्या ४०० च्या वर पोहचली आहे. उच्च शिक्षणामध्ये भारतातील विविध केंद्रीय विद्यापीठ, राज्य विद्यापीठ आणि जिल्हा स्तरावरील समाजकार्य महाविद्यालय निर्माण झालेली आहेत. देशाच्या तुलनेत महाराष्ट्रात आजघडीला ६३ महाविद्यालय कार्यरत असुन त्या पैकी ५२ अनुदानित महाविद्यालय आहेत. त्या मध्ये ५० महाविद्यालयाना महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय विभागामार्फत अनुदान मिळते व एक महाविद्यालयास (मातृ सेवासंघ नागपूर) राज्य शासनाच्या उच्च शिक्षण विभागामार्फत अनुदान प्राप्त आहे.

महाराष्ट्रातील १६ विद्यापीठापैकी १३ विद्यापीठामध्ये व्यावसायिक समाजकार्याचे शिक्षण दिले जाते त्यात, पदवी व पदव्युत्तर आणि महाराष्ट्रातील ९ विद्यापीठातील संशोधनाच्या दृष्टिकोनातुन एम.फिल. आणि पीएच.डी. सारखे विषय आंतरविद्याशाखा या शाखेतुन चालविले जातात. सध्या महाराष्ट्रातील व्यावसायिक समाजकार्य महाविद्यालयाच्या विचार केला तर, जास्तीस जास्त महाविद्यालय ही महाराष्ट्रामध्ये कार्यरत असलेल्या ६ विभागापैकी विदर्भात महाविद्यालय दिसुन येतात.

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठा अंतर्गत सामाजिक शास्त्र्ये संकुल व त्याची उपकेंद्र (लातुर आणि परभणी), आनुदानित महाविद्यालय जवाहरलाल नेहरू समाजकार्य महाविद्यालया व संशोधन केंद्र सिडको व विना आनुदानित महाविद्यालय विवेकानंद कॉलेज ऑफ इन्फॉरमेशन ॲन्ड टेक्नालॉजी, अखिल सर समाजकार्य महाविद्यालय अशी एकुण सहा समाजकार्य शिक्षण देणारी महाविद्यालये आहेत.

क्षेत्रकार्य संकल्पनेची ओळखः

समाजकार्य शिक्षणात विद्यापीठाने ठरविलेल्या सिध्दांताच्या अध्ययनासोबतच क्षेत्रकार्य किंवा प्रात्याक्षिकाला अनन्य साधारण महत्तव आहे. सन १९८० च्या

समाजकार्य शिक्षण आढावा समितीने समाजकार्य अभ्यासक्रमामध्ये एकुण गुणांच्या एक तृतीयांश गुणांचे क्षेत्रकार्य असावे असे म्हटले आहे.

समाजकार्य हा एक व्यवसाय असल्याने त्यामध्ये सैध्दांतिक ज्ञान व क्षेत्रकार्य या दोन्ही गोष्टीना विशेष प्राध्यान्य आहे.विज्ञान शाखेत ज्याप्रमाणे प्रयोगशाळा असते त्याप्रमाणे समाजकार्य अभ्यासक्रमामध्ये सुध्दा प्रयोगशाळा असते फरक एवढाच असतो की, विज्ञान शाखेतील प्रयोगशाळा बंदिस्त स्वरूपाची असते उलट समाजकार्याची प्रयोगशाळा खुल्या स्वरूपात म्हणजे व्यक्ती,गट, समुदाय, व समाज इ. स्वरूपात असते. समाजकार्य अभ्यासक्रत क्षेत्रकार्याविना पूर्ण करणे कदापी शक्य नाही.

क्षेत्रकार्य हा समाजकार्य अभ्यासक्रमातील अतिशय महत्वाचा व आवश्यक घटक आहे. समाजकार्य अभ्यासक्रमात क्षेत्रकार्य म्हणजे 'कृतीतून शिक्षण' घेणे होय. समाजकार्य अभ्यासक्रमामध्ये कृतीला अनन्यसाधारण महत्व असते आणि प्रत्यक्ष कृतीतूनच विद्यार्थ्यामध्ये सामाजिक मूल्ये,दृष्टीकोण अणि कौशल्य विकसित होताना दिसतात. ह्या सर्व बाबी कृतीतून प्रत्यक्ष कार्याद्वारे प्राप्त होतात. क्षेत्रकार्य हा विद्यार्थ्यांच्या दृष्टीकोनातून अतिशय समाधानकारक व ज्ञान संपन्न करणारा घटक आहे. समाजातील व्यक्तिसोबत कार्य करतानां ह्या बाबी महत्वाची भूमिका समजली जाते. क्षेत्रकार्याद्वारे व्यावसायिक समाजकार्याच्या पध्दतीचा समाजातील व्यक्ती,गट, कुटुंब आणि समुदाय यांच्यासोबत कार्य करतांना या बाबीचा वापर करण्यात येतो.

थोडक्यात, समाजकार्य पध्दतीचा प्रत्यक्ष क्षेत्रकार्याकध्ये काम करतांना कसा वापर करावा ह्या संदर्भातील मार्गदर्शक संधी म्हणजे क्षेत्रकार्य होय. या सोबतच व्यावसायिक समाजकार्याचे ज्ञान व अनुभव सुध्दा क्षेत्रकार्यामार्फत विद्यार्थ्यांना मिळते त्यामुळे क्षेत्रकार्याच्या वर्गातील शिकविलेल्या सिध्दांच्या जवळचा संबंध असतो. क्षेत्रकार्यार्तगत विद्यार्थ्यांना सिध्दांच्या वापरासंबंधी व कौशल्यासंबंधी प्राध्यापकांकडुन वेळीवेळी मार्गदर्शन मिळतच असते. क्षेत्रकार्य हा समाजकार्य शिक्षणतील नियोतीज शैक्षणिक व व्यावसायिक मार्गदर्शक कार्यक्रम आहे यामुळे विद्यार्थ्यांना समाजातील वास्तववादी जीवनाची जवळुन ओळख होते व कल्याणकारी कार्यक्रमाची सविस्तर कल्पना येते. व्यावसायिक व्यक्तींच्या समस्या जाणुन घेणे, लोकांसोबत काम करणे, समाजात कार्य करतांना आवश्यक ज्ञान, तंत्र व कौशल्य अवगत करणे, व्यावसायिक समाजकार्याच्या सिध्दांताचा अवलंब करणे, कृतीतून समाजकार्याचे शिक्षण घेणे व व्यावसायिक विकास साधणे इ. विविध बाबी विद्यार्थ्यांना समाजकार्य शिक्षणातील क्षेत्रकार्य या उपक्रमातुन मिळते आणि म्हणुन या कार्यक्रमाचे समाजकार्य शिक्षणात अत्यंत महत्वाचे स्थान आहे. समाजकार्य हा एक व्यावसायिक अभ्यासक्रम असल्याने त्यामध्ये प्रात्यक्षिक म्हणजे क्षेत्रकार्याला फार महत्व आहे. समाजकार्य शिक्षणात सिध्दांतासोबत क्षेत्रकार्य हे अत्यंत काटेकोरपणे विद्यार्थ्यांकडून करूण घेतले जाते. या करिता संबंधित महाविद्यालय व महाविद्यालयातुन दिल्या जाणाऱ्या क्षेत्रकार्याच्या संस्था यांच्या मदतीने सहामाहिक अथवा वार्षिक नियोजन करण्यात येते ज्या मध्ये महाविद्यालयातील प्राध्यापकांचे प्रामुख्याने सहकार्य असते. क्षेत्रकार्य या घटकावर

महाविद्यालयाचा अधिक भर दिलेला आहे. कारण क्षेत्रकार्य हे विविध शासकिय, निमशासकिय व स्वयंसेवी संस्थेत पूर्ण वेळ क्षेत्रकार्य केले जाते.

समाजकार्य शिक्षणात मानसशास्त्र, समाजशास्त्र, सामाजिक व्यक्तीसहयोग कार्य, सामाजिक गटकार्य, समुदाय संघटन, समाजकल्याण प्रशासन, समाजकार्य संशोधन, सामाजिक चळवळ, सामाजिक कायदे, कुटुंब, युवक व बालकल्याण, इत्यादी विविध विषयांच्या सिध्दांताचा अभ्यास केला जातो हे विषय वर्गामध्ये शिकविले जातात त्याची सत्यता विद्यार्थ्यांना क्षेत्रकार्याच्या माध्यमातुन पडताळून पाहता येते. समाजकार्य शिक्षण हे व्यावसायिक असल्याने यात समाजकार्याच्या सहा पध्दतींचा (सामाजिक व्यक्तिसहयोग कार्य,सामाजिक गटकार्य, समुदाय संघटन कार्य, समाजकल्याण प्रशासन, समाजकार्य संशोधन व सामाजिक कृती) अवलंब क्षेत्रकार्यामुळे सहज करता येतो. जसे सामाजिक व्यक्तिसहयोगकार्य ही पध्दत प्रत्यक्षात विद्यार्थ्यांना अभ्यासता येते त्यामुळे सैध्दांतिक ज्ञान आणि क्षेत्रकार्य याचा जवळचा संबंध आहे. समाजकार्यात क्षेत्रकार्याच्या माध्यमातुन प्रत्यक्ष कार्य केल्याने विद्यार्थ्यांची लेखन, वक्तृत्व, ऐकणे, आचार विचार व निरीक्षण इ. कलाकौशल्ये विकसित केली जातात क्षेत्रकार्य हा घटक विद्यार्थ्याच्या दृष्टिकोनातुन स्वयंपूर्ण बनविणारा आहे यात विद्यार्थ्यांनी ठरविलेल्या नियोजनानुसार कार्य करण्याची एक प्रकारे संधी असते. प्रत्येक गोष्ट विद्यार्थी स्वत: ठरवून त्या संबंधीचे मार्गदर्शन संबंधित प्राध्यापकांकडुन तो घेत असतो. क्षेत्रकार्य केल्यांनतर तो त्या दिवसाचा अहवाल लिखान करतो. त्यामुळे त्याचे लेखन कौशल्य विकसित होते तसेच इतरही अनेक कौशल्य विकसित होत जातात. क्षेत्रकार्य करतांना विद्यार्थी प्रत्यक्षपणे विविध समस्यांचा अभ्यास करून त्या समस्या अशिलांच्या सहकार्याने सोडविण्याचा प्रयत्न करतो. जसे, एखाद्या संस्थेमध्ये समस्याग्रस्त व्यक्तीचा सामाजिक व्यक्तीसहयोग कार्याकरिता निवड करून त्याची समस्या त्याचाच सहकार्याने सोडविण्याचा प्रयत्न केला जातो. यामध्ये तो वर्गात शिकविलेल्या सैध्दांतिक ज्ञानाचा प्रामुख्याने अवलंब करतो यामुळे अभ्यासासोबतच त्या समस्या सोडविण्याचा प्रयत्न केलेला असतो. क्षेत्रकार्य हे गटागटामध्ये केले जाते त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये परस्पर सहकार्य वृत्तीचा विकास होतो. कारण एकमेकांना ते मदत करीत असतात व अनेक कार्यक्रम एकत्रित येवून पूर्ण करतात. क्षेत्रकार्यामध्ये असतांना त्याला पूर्ण स्वातंत्र्य असते त्यामुळे वैचारिक क्षमतांचा विकास होतो. क्षेत्रकार्यामध्ये विद्यार्थी अशिलाचे महत्वाचे स्थान देण्यात येतो व प्रत्येकांशी सन्मानाने वागण्याचा प्रयत्न करतो त्यामुळे मानवतावादी दृष्टिकोण निर्माण होण्यास मदत होते.

भारतात समाजकार्य प्रशिक्षण संशोधनाच्या उदयानंतर सात दशके संपूर्ण सुध्दा आजतागायत पाश्चिमात्य क्षेत्रकार्य पध्दतीवरच आम्ही अवलंबुन आहोत आणि दुर्दैवाची बाब म्हणजे या विषयावर फार मोठया प्रमाणांवर संशोधने झालेली नाहीत. विकास प्रक्रियेमुळे सामाजिक संदर्भ बदलत आहेत. सामाजिक समस्या ही बदलत आहेत व त्यामुळे समाजकार्यातर्गत असलेल्या क्षेत्रकार्यामध्ये बदल अभिप्रेत आहेत.

क्षेत्रकार्याच्या व्याख्या:

‘समाजशास्त्रीय शब्दकोष आणि संबंधित शास्त्रानुसार यांच्या मते, क्षेत्रकार्यामार्फत भौगोलिकदृष्टया विभाजीत झालेली लोकसंख्या या संबंधीचे प्राथमिक तथ्य संकलन केले जाते.’

‘समाजकार्य शिक्षणात क्षेत्रकार्य ही एक मार्गदर्शक आंतरक्रियेची प्रक्रिया आहे की, ज्यामध्ये विद्यार्थ्यामार्फत प्रत्यक्ष जीवनाचा सखोल अभ्यास आणि सर्वांगीण विकासाकरिता मानवी क्षमतांचा विकास करण्याचा प्रयत्न केला जातो.’

समाजकल्याण संस्था व समुदाय यांच्यात समाजकार्याद्वारे क्षेत्रकार्य घडवुन आणले जाते. त्या ठिकाणी शैक्षणिक नियोजानाप्रमाणे विद्यार्थी विविध कौशल्य व शास्त्रीय ज्ञान अवगत होताना दिसते. क्षेत्रकार्य हे एक प्रशिक्षण असुन प्रशिक्षित समाजकार्यकर्ता किंवा संस्था पर्यवेक्षक यांच्या मार्गदर्शनाखाली ते केले जाते. क्षेत्रकार्याद्वारे विद्यार्थ्यांना व्यक्ती, गट, आणि समुदाय यांचा प्रत्यक्ष अभ्यास केला जातो. त्यातुन विद्यार्थी मानवाच्या गरजांच्या अभ्यास करतात. क्षेत्रकार्य हे विद्यार्थ्यांमार्फत पूर्णवेळ किंवा अर्धवेळ केले जाते त्याला समाजकार्य शिक्षणातील क्षेत्रकार्य असे म्हणतात.

क्षेत्रकार्याची व्याख्या करतांना मेश्राम म्हणतात की, समाजकार्याचे क्षेत्रकार्य व्यावसायिकदृष्टया मार्गदर्शित व अशी योजनाबध्द प्रक्रिया आहे जिच्या माध्यमातुन व्यावयाकिदृष्टया समाजकार्यकर्ता तयाल करण्यासाठी विद्यार्थ्यांना निर्धारित क्षेत्रात (संस्था/संघटना/समुदाय/समाज) मानवी जीवनाच्या सत्य परिस्थितीचा अनुभव देण्यासाठी अशिल व्यवस्थेचे (व्यक्ती/गट/समुदाय/संस्था इ.) सुक्ष्म निरीक्षण व अभ्यास करण्यासाठी व त्याआधारे समाजकार्य मध्यस्थीकरणासाटी, व्यावसायिक ज्ञान व पध्दतीचा उपयोग कसा करावा इ. सरावाची संधी निर्माण करूण दिली जाते.

समाजकार्य शिक्षणातील क्षेत्रकार्याच्या विविध शास्त्रज्ञ व विचारवंताच्या व्याख्याच्या अभ्यास केल्यानंतर संशोधकांच्या मते समाजकार्य शिक्षणातील क्षेत्रकार्य ही एक अत्यंत महत्वाची व मुलभूत अशी संकल्पना असुन यामध्ये विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष कार्य करण्याची संधी मिळते त्यामुळे विद्यार्थी अधिक प्रगल्भ व परिपूर्ण बनतात तसेच क्षेत्रकार्याद्वारे विद्यार्थ्यांमध्ये विविध कौशल्य व शास्त्रीय ज्ञान विकसित होते. त्याचप्रमाणे स्थानिक भागातील लोकांच्या गरजांचा व विविध समस्यांचा शोध घेता येतो आणि ग्रामीण भागाला पूरक असे व्यवसाय निर्माण केले जातात यातून युवकांच्या बेरोजगारीचा प्रश्न सुटण्यास मदत होते.

क्षेत्रकार्याची वैशिष्टये:

१. क्षेत्रकार्यात प्रत्यक्ष कृतीतून प्रशिक्षण दिले जाते.
२. विद्यार्थ्यांना क्षेत्रकार्यामध्ये संस्था पर्यवेक्षक व प्राध्यापकांकडुन सतत मार्गदर्शन मिळते.
३. विद्यार्थ्यांमध्ये विविध क्षमतांचा व कौशल्याचा विकास होताना दिसतो.

४. क्षेत्रकार्य हे शासकिय, निमशासकिय आणि सेवाभावी किंवा स्वयंसेवी संस्थेमध्ये केले जाते.
५. क्षेत्रकार्यात पर्यवेक्षणाला अत्यंत महत्वाचे स्थाल आहे.
६. क्षेत्रकार्यात समाजकार्य सिध्दांचा पुरेपुर अवलंब केला जातो.

क्षेत्रकार्याचे उद्देश:

१. विद्यार्थ्यांमध्ये समाजातील स्थानिक परिस्थितीचे निरीक्षण व विश्लेषण पात्रतेचा विकास करणे.
२. समाजिक व्यवस्था व गतिशीलता यांची वैशिष्टये समजुन घेणे.
३. व्यक्तिच्या गरजा, सामाजिक समस्या व सामाजिक प्रश्नविषयी लोकसहभाग मिळविणे.
४. समाजिक कायदे, प्रक्रिया व सामाजिक धोरणंचा सूक्ष्म अभ्यास करून टिकात्मक परीक्षण करणे.
५. समाजकार्य अभ्यासक्रमातील सिध्दांताचा प्रत्यक्ष वापर करण्याचा क्षमतांचा विकास करणे.
६. समाजकार्याच्या व्यावसायिक नितीमूल्यांचा विकास करणे.

विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्व विकासाची गरज:

विद्यार्थ्याच्या काही महत्वपूर्ण गरजा असतात. त्या म्हणजे त्या वेळीच भागविणे हे कुटुंब, समाज, शासनाची जबाबदारी असते. विद्यार्थ्यांच्या गरजाकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. जर त्यांच्याकडे दुर्लक्ष झाले तर त्यांचे रूपांतर हे विविध आव्हानात होते आणि नंतर समस्येत होत असते. आज युवकांना विविध आव्हाना समोर जावे लागत आहे. हे आपण वर पाहिली आहे. आजचा विद्यार्थ्यांसमोर महत्वपूर्ण बेरोजगार, विविध व्यसनाधिता, गोंधळलेली अवस्था, विविध गुप्तरोगांचा शिकार, दिशाहिनता, आत्मविश्वाचा अभाव, योग्य ज्ञानाचा अभाव, विविध कौशल्याचा अभाव, गुन्हेगारी प्रवृत्ती वळलेली दिसुन येते आणि ही आजच्या तरूणाची वास्तव स्थिती आहे. या स्थितीमधून तरूणांना अनगद वर काढायाचे असेल तर विद्यार्थ्यांचे व्यक्तिमत्व विकसित करणे ही काळाची गरज आहे. ही गरज भरून काढण्याची जबाबदारी ही कुटुंब, शाळा, महाविद्यालये, विविध संस्था आणि शासन यांच्यावरती आहे.

मग व्यक्तिमत्व म्हणजे काय? व्यक्तिमत्व विकसित कसे करता येवू शकते? युवकांचे व्यक्तिमत्व कसे विकसित कसे करायचे? सहाजिकच असा प्रश्न पडतो यासाठी सर्व प्रश्न आपण व्यक्तिमत्व समजून घेवू या. व्यक्तिमत्व समजून घेणे थोडे अवघड काम आहे. तरी कार्यात्मकरित्या काही अभ्यासकांनी व्यक्तिमत्वाच्या काही व्याख्या केलेल्या आहेत त्या आपण समजून घेवूया.

व्यक्तिमत्वाच्या व्याख्या:—

व्यक्तिमत्वाचा अधिक अर्थ समजुन घेण्यासाठी शास्त्रज्ञांनी केलेल्या व्यक्तिमत्वाच्या व्याख्या पाहु.

१. मन या शास्त्रज्ञांचा मते, व्यक्तिची शरीर रचना, वर्तन पध्दती, अभिरूची, बुध्दीमत्ता विविध योग्यती आणि प्रगट वैशिष्टांचा संघाला व्यक्तिमत्व असे म्हणतात.
२. रेक्सरोड यांच्यामते, सामाजिक दृष्टया स्विकारणी व अस्विकारणी लक्षणांचा समतोल म्हणजे व्यक्तिमत्व होय.
३. टॅक्सलर, ए.इ. यांच्या मते, व्यक्तिमत्व म्हणजे सामाजिक परिस्थिती घडणाऱ्या व्यक्तिचा वर्तनाची गोळाबेरीज होय.

व्यक्तिमत्वाची महत्वपूर्ण वैशिष्टये:

व्यक्तिमत्व समजुन घेण्यासाठी आपण आता व्यक्तिमत्वाचे खालीलप्रमाणे वैशिष्टये पाहु.

१. **व्यक्तिची शारिरीक ठेवण:** व्यक्तिमत्वाचा महत्वाचा घटक म्हणजे त्या व्यक्तिला लाभलेल शरीर आणि त्यासोबतच त्याची शरीराची ठेवण होय.
२. **बुध्दी:** व्यक्तिमत्वाचे वैशिष्टये म्हणजे त्या व्यक्तिची बुध्दीमत्ता होय. व्यक्तिची बुध्दीमत्ता हे व्यक्तिच्या व्यक्तिमत्वाचे अंतरिक प्रकार होय.
३. **चारित्र्य:** चारित्र्य हे व्यक्तिमत्वाचे वैशिष्टये आहे ते व्यक्तिला स्वत:च विकसित करावे लागते. ते कोठे बाजारात विकत घेता येणारी गोष्ट नाही. व्यक्ति ही चारित्र्य संपन्न असायला हवी.
४. **कर्तृत्व:** व्यक्तिचे कर्तृत्व हे व्यक्तिमत्व बनवण्यासाठी महत्वाचह भूमिका पार पाडते. व्यक्ति जीवनात काय करतो, कोणत्या वयात काय करत करतो, कोणत्या वयात काय करत असतो.
५. **स्थिरभाव:** स्थिरभाव हा व्यक्तिचा सर्वात चांगला गुणधर्म आहे. कारण व्यक्ति जीवनात अनेक वेळा अनेक संकटे येत असतात. त्या संकटाचा सामना व्यक्तिला द्यावे लागत असते. जर व्यक्तिचे वर्तन स्थिर असेल तर व्यक्ति कोणत्याही संकटांचा सामना सहज करू शकता.
६. **अभिवृत्ती:** अभिवृत्ती हे व्यक्तिमत्व मजबुत करण्यासाठी मदत करत असते. व्यक्तिच्या भाव, भावना, संवेग, संप्रेरके, प्रेरणा, विचार, त्याचा दृष्टीकोण या वरून व्यक्तिचे वर्तन प्रकट होत असते.
७. **वर्तन पध्दती:** वर्तन पध्दती ह्या व्यक्तिचे व्यक्तिमत्व तयाल होण्यासाठी महत्वाची भूमिका पार पाडत असतात. व्यक्तिचे वर्तन अथवा सवयी समाज मान्य असेन तर ती व्यक्ति समाजात आदर्शरूपाने पाहिली जाते तर समाजबाहय वर्तन करणाऱ्या व्यक्तिला समाजाकडुन दुषाने मिळत असतात.
८. **विविध योग्यता:** व्यक्तिचे व्यक्तिमव सुधारण्यासाठी त्या व्यक्तिमध्ये कोण कोणत्या योग्यता किंवा पात्रता आहेत यावरून ठरत असते. व्यक्तिला त्याचे व्यक्तिमत्व विकसित करण्यासाठी त्याच्यातील गुण वाढविणे गरजेचे आहे.

ज्ञान,वाचन,प्रामाणिक, सत्य, अहिंसा, प्राणीमात्रावर प्रेम इ. विविध योग्यता व्यक्तिमत्वाचे वैशिष्टये होय.

व्यक्तिमत्व विकासावर परिणाम करणारे घटक:

आजच्या काळात व्यक्तिमत्व विकासाला अनन्य साधारण महत्व प्राप्त झाले आहे. स्पर्धेच्या युगात प्रत्येक व्यक्ति स्वत:ला इतरांपेक्ष सरस करण्याचा प्रयत्न कारत आहे. व्यक्तिमत्वात भर पाडण्यासाठी आजचा युवक अथक प्रयत्न करीत असतो. त्यासाठी वेळ, श्रम आणि पैसा मुबलक प्रमाणात खर्च केला जात आहे. काही ठिकाणी व्यक्तिमत्व विकासाचे प्रशिक्षण केंद्रे सुरू झाले आहेत. व्यक्तिमत्व विकास करीत असतांना दुसऱ्या बाजुला व्यक्तिमत्व विकासावर काही घटकांच्या प्रभाव पडत असताना दिसतो. व्यक्तिमत्व विकासावर कोण कोणते प्रभाव टाकतात ते खालीलप्रमाणे आहेत.

१. **व्यक्तिची अनुवंशिकता:** प्रत्येक व्यक्ति स्वत:चे व्यक्तिमत्व अधिक खूलुन दिसण्यासाठी प्रयत्न करत असतो. मात्र अनेक व्यक्तिमत्व विकासात बाधा निर्माण झालेली दिसुन येते म्हणजेच त्या व्यक्तिच्या व्यक्तिमत्वावर त्याची अनुवंशिकता प्रभाव टाकत असते.

२. **व्यक्तिची शरीरयष्टी:** व्यक्तिचे व्यक्तिमत्व प्रभावी दिसण्यासाठी त्यास लाभलेली त्याची शरीर संपदा खुन महत्वाची कामगीरी बजावते. जर व्यक्तिच्या शरीराची संपुर्ण क्रमाक्रमाने वाढ व्यस्थित झाली असेल तर त्याचे व्यक्तिमत्व अधिक सुडोल दिसते.

३. **व्यक्ति जेथे राहतो तो समाज:** व्यक्ति ज्या समाजात राहतो तेथील वातावरण, त्या समाजातील नातेदारी, सहसंबंध, त्या समाजाच्या रीतीरीवाज, प्रथा, परंपरा, सण, संस्कृती, व्यक्ति आत्मसात करतो.

४. **व्यक्तिची संस्कृती:** व्यक्तिच्या व्यक्तिमत्वा वरती संस्कृतीमध्ये प्रभाव टाकीत असते. संस्कृतीमध्ये खान,पान, कपडा, लता, दाग, दागिने, घर, काम, नक्षी, कलाकृती, भाषा अशा गोष्टीचा अंतर्भाव होतो.

५. **भौगोलिक स्थिती:** व्यक्ति ज्या प्रदेशात राहतो त्या प्रदेशातील व्यक्तिची शारीरक ठेवण आणि स्वभाव गुण बनत जातात.व्यक्तिचे व्यक्तिमत्व विकसित होण्यासाठी त्या व्यक्तिचा भौगोलिक प्रदेश महत्वपूर्ण योगदान देत असतो.

अशा प्रकारे व्यक्तिच्या व्यक्तिमत्व विकासावर परिणाम करणारे घटक नमुद केल्याप्रमाणे आहेत.

व्यक्तिमत्व विकासासाठी घ्यावयाची काळजी:

प्रत्येक व्यक्ति स्वत:चे व्यक्तिमत्व विकसित करण्यासाठी अनेक प्रयत्न करत असतो. त्या अनुषंगाने काय करायला पाहिजे. युवकांनी कोणती काळजी घ्यायला पाहिजे. जेणे करून व्यक्तिच्या व्यक्तिमत्वात भर पडेल आणि जीवनात यशस्वी होवू शकेल. त्या संदर्भात खालीलप्रमाणे पाहु.

१. **स्वत:ला जाणून घेणे:** व्यक्ति स्वत:चे व्यक्तिमत्व विकसित करण्यासाठी स्वत:ला अभ्यासले पाहिजे. स्वत:ला अभ्यासणे म्हणजे स्वत:मध्ये असलेले गुण, गोष्टी, बलस्थाने ही होत.

२. **सकारात्मक विचार आणि कार्य केले पाहिजे:** व्यक्तिचे त्याचे व्यक्तिमत्व विकसित करताना त्याने नेहमी त्याच्यामध्ये सकारात्मक भावना जागृत केल्या पाहिजेत.

३. **स्वत:ची मते तयार करा:** व्यक्तिचे स्वत:चे मत असले पाहिजे. व्यक्तिने स्वतंत्र विचार करायला पाहिजे, त्याच्याकडे विचार सरणी असायल हवी. त्याला योग्य आणि अयोग्य यामधला फरक कळायला पाहिजे.

४. **नविन लोकांना भेटी त्यांच्या कडुन शिकले पाहिजे:** व्यक्तिने त्याचे व्यक्तिमत्व विकसित करण्यासाठी त्याने नेहमी प्रयत्नशिल असले पाहिजे. त्याने रोज निदान एक तरी व्यक्तिला भेटले पाहिजे त्यामुळे सामाजिक नात्यांचे जाळे वाढत जाईल व व्यक्ति समाजात जीवन जगत असताना त्याचा सामाजिक नात्यांच्या जाळयाचा त्यास लाभ होवू शकतो.

५. **आत्मपरिक्षण करणे:** व्यक्ति जीवन जगत असताना बहुतेक वेळा कामे करतांना व्यक्तिच्या हातून चुका होतात. त्या वेळीच सुधारल्या नाही तर त्या जगू देत नाही, त्या अवघड करतात. त्या सोडविण्यासाठी व्यक्ति स्वत:चे आत्मपरिक्षण करणे गरजेचे असते.

वरील मुद्यांचा आधार घेवुन व्यक्तिला त्याचे व्यक्तिमत्व कमी अधिकरीत्या सुधारता येते या व्यतिरीक्त आणखी बऱ्याच गोष्टी करता येण्याजयेगे आहेत.

युवकांच्या व्यक्तिमत्व विकास साध्य करण्यासाठी शासनाने विविध कार्यक्रम भारतात राबविले. हा खुप मोठा कार्यक्रम असुन ज्यात भारतातील युवक मोठया प्रमाणात शैक्षणिक जिवनात फरक पडताना पाहण्यास मिळतो.

विद्यार्थ्यांचा व्यक्तिमत्व विकास आणि क्षेत्रकार्याचा सहसंबंध:

क्षेत्रकार्य करित असताना क्षेत्रकार्य करणाऱ्या विद्यार्थ्यी समाजातील विविध घटकांच्या संपर्कात येत असतो. सपर्काचा माध्यमातुन सामाजिक संबंध वृंध्दिगत होत असतात. समाजातील विविध घटकांचा चर्चा करत असताना विद्यार्थ्यांना नवनविन समस्या बद्दल माहिती मिळुन त्याच्या ज्ञानात भर पडत असते.

क्षेत्रकार्याच्या माध्यमातुन विद्यार्थ्यांना समाजातील विविध घटक सोबत चर्चा करत असताना लागणारे कौशल्य विकसित होते. समाजातील समस्या कशा विकसित होतात कोणते घटक जबाबदार असतात. जबाबदार घटकावरती कशा पध्दतीने उपचार करावा लागतो असे व इतर व्यक्तिमत्व विकासवर परिणाम करणारे विविध घटक क्षेकार्याच्या माध्यमातुन क्षेत्रकार्य करणाऱ्या विद्यार्थ्यात झिरपत असतात व व्यक्तिमत्व विकास घडत असते.

१. सामाजिक सहसंबंध.

२. सामाजिक समस्या.

३. अभिव्यक्ति स्वातंत्र्य.
४. साकारात्मक विचार.
५. उत्कृष्ठ श्रवणीय क्षमता.
६. संस्कृती अवगत करणे.
७. नविन सहसंबंध प्रस्थापित करणे.

संदर्भ साहित्याचा आढावा

समाजकार्य शिक्षणात क्षेत्रकार्याला अन्यन साधारण महत्व आहे. खऱ्या अर्थाने भारतात व्यावसायिक समाजकार्याची सुरूवात तशी १९३६ साली झाली. समाजकार्याच्या क्षेत्रकार्याचा शिक्षण आणि प्रशिक्षण आवश्यक असे संदर्भ सुची ग्रंथाची निर्मिती आवश्यक असते. तसे पाहता समाजकार्याच्या क्षेत्रकार्या संदर्भात आज पर्यंत फार कमी प्रमाणाम संशोधन करण्यात आलेले दिसुन येते. नांदेड जिल्हात अध्यापही समाजकार्य शिक्षणातील क्षेत्रकार्य या विषयात संशोधकाने मागील संशोधनात समाजकार्य क्षेत्रकार्या संदर्भात निष्कर्ष मांडण्यात आले आहेत जे पाहुयात.

१. Singh R.R., भारतातील समाजकार्याचे यशस्वीरित्या व्यावसायिक करण होण्यासाठी 'क्षेत्रकार्य' हा समाजकार्य शिक्षणाचा गाभा असुन वर्गातील शिकविल्या जाणारा विषयास सैध्दांतिक ज्ञानास प्रत्यक्षात अवलंब करण्यासाठी आठवडयातुन दोन दिवस क्षेत्रकार्य करण्यासाठी देण्यात येते. तसेच क्षेत्रकार्य नियोजनात केलेली कृती असावी लागते ज्यात क्षेत्रकार्याचे नियोजन, आयोजन, संघटन, कुशल कार्यकत्याचे मार्गदर्शन, समन्वय, अंदाजपत्रक, अहवाल लेखन तयार करणे होय. या क्षेत्रकार्याच्या विकास व्हावा असे क्षेत्रकार्य उपाययोजनात्मक संशोधन निष्कर्ष मांडले जाते.
२. Kaushile S., अध्ययन आणि अध्यापनाची प्रक्रिया या शोध निबंधात क्षेत्रकार्याच्या माध्यमातुन विद्यार्थ्यांना आपले भूतकाळातील अनुभव, बुध्दीमत्ता, दृष्टीकोन व आवड यांची माहिती मिळत असते.
३. Tikate K., क्षेत्रकार्य प्रशिक्षणाचे घटक यांचे क्षेत्रकार्याचे घटक पाहत असताना ते म्हणतात कि, समाजकार्य शिक्षणातील क्षेत्रकार्य हे क्षेत्रकार्याची संस्था, विद्यार्थ्यी आणि पर्यवेक्षक या तीन घटकांवर आवलंबुन असते.
४. Lawani,B., "Social Work Education & Filed Instrction" या शोध प्रबंध प्रमुख तीन प्रभागात विभागण्यात आलेला दिसतो. पहिला भागात – समाजकार्य क्षेत्रकार्य बाबतीत ध्येय, उद्देश, घटक, संरचना समाजकार्य क्षेत्रकार्य शिक्षणाची गरज असते. तर दुसरा भागात – क्षेत्रकार्य हा भारतातील प्रत्येक राज्यातील महाविद्यालयातील एक अत्यंत प्रभावशाली भाग आहे. या समाजकार्य शिक्षणाची सुरूवात प्रशिक्षण देण्यापासुन झालेली दिसते. क्षेत्रकार्य प्रशिक्षणात सैध्दांतिक ज्ञान आणि प्रत्यक्ष क्षेत्रकार्याच्या सुंदर मेळ घालत क्षेत्रकार्यावर भर देण्यात येते. आणि तिसऱ्या

भागात – प्रत्यक्ष क्षेत्रावरील कृती व आराखडा यांची माहिती स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाशी संलग्न असलेले समाजकार्य महाविद्यालय प्रत्यक्ष क्षेत्रकार्य निष्कर्ष, निवडक सुचना घेण्यात आल्यात.

क्षेत्रकार्य मूल्यमापना मध्ये वरील दिलेल्या सर्व बाबीच्या आधारावर क्षेत्रकार्याच्या अभ्साय तपासलस जातो.

५. U.G.C. Model Currculim Social Work Education या नमुद केल्याप्रमाणे समाजकार्याच्या क्षेत्रकार्या अंतर्गत विद्यार्थ्यांमध्ये निरीक्षण क्षमता वाढीस लागते. समाजव्यवस्था कशी निर्माण होतो अथवा ती कशा प्रकारे राबविती जाते यांची समज सुध्दा यांत दिसुन येते. या अंतर्गत लोकसहभागाचे महत्व विद्यार्थ्यांना लक्षात येते.

कायदा व्यवस्था व त्याची आंमलबजावणी या विषयाची ज्ञान व माहिती मिळवणयास मदत होते. या शोध निबंधात सोबतच क्षेत्रकार्याच्या आठ उपक्रमाची यांच्यात माहिती देण्यात आली आहे. या मधील मार्गदर्शक सुचना म्हणजे समाजकार्य महाविद्यालयातील परिपूर्ण करणे होय.

६. Mujawar W., Sardar N., ‘Filed Work Traning in Social Work या पुस्तकात लेखकांचे मनोगत लक्षात घेता. समाजकार्याचे शिक्षण देणाऱ्या महाविद्यालयातील क्षेत्रकार्य एक एकात्मिक भाग होय. क्षेत्रकार्याच्या अंतर्गत व्यावसायिक समाजकार्यातील संकल्पना प्रत्यक्ष कार्यान्वित केला जातात. यामुळे क्षेत्रकार्याच्या प्रत्यक्ष पध्दतीमुळे विद्यार्थ्यांना व्यावसायिक विकास साधण्यास मदत मिळते.

७. Field Work Manual For First Year Social Work यात प्रात्याक्षिक क्षेत्रकार्य शिक्षणात सहभागी व्यक्तिच्या जबाबदाऱ्या, क्षेत्र आणि क्षेत्रकार्याच्या ओळख आणि पर्यवेक्षण या विषयी माहिती दिलेली आहे. क्षेत्रकायामार्फत विद्यार्थ्यांना समाजकार्य शिक्षणाच्या उद्देश व्यावसायिक स्व विकास, ‘स्व’ ची जाणीव, कौशल्यात सुधारणा करणे, स्व आत्मविकासात बदल घडविणे, संघटनात्मक कार्य व समाजकार्याच्या विविध अभ्यास आणि पध्दती अभ्यासाच्या योग्य दिशा मिळते. (१९९४ साली)

८. Report of Social Work Education Second Review Committee या शोध निबंधात असे नमुद केलेले दिसते कि, क्षेत्रकार्य हा व्यावसायिक समाजकार्य शिक्षणातील अत्यंत महत्वाचा घटक असुन यात व्यावसायिक समाजकार्याची शिक्षणाची अमलंबजावणी केली जाते. तसेच या मध्ये तत्थाचे संकलन, विश्लेषण आणि समस्या सोडविण्यासाठी आवश्यक असलेले तंत्र, कौशल्य, विकासाचे पैलू तपासुन घेणे.

९. Field Work Manual For First Year Social Work – 1998 या प्रास्ताविक, क्षेत्रकार्याचे उद्देश, ध्येय, क्षेत्रकार्य समन्वयक, प्राध्यापक, व संस्था पर्यवेक्षक इ. जबाबदाऱ्या समाजकार्य पध्दतीचा अवलंब करावा लागतो. तसेच संस्था अवलोकन भेटी, गटकार्यशाळा, ग्रामीण शिबीर, दैनंदिनी क्षेत्रकार्य, पर्यवेक्षण, अहवाल लिखाण

आणि मूल्यमापन इ. या व्यावसायिक समाजकार्याच्या अभ्यास क्रमात मांडणी करण्यात आली.

१०. जनगणना २०११ च्या अहवालानुसार भारतातील एकुण लोकसंख्ये पैकी २७.०५ टक्के लोकसंख्या ही १५ ते २९ या वयोगटातील होय (भारतीय जनगणणा अहवाल,२०११)

११. हॉफर, इरिक (१९५१) या लेखकांनी युवकांच्या समस्येचा अभ्यास करूण असे विश्लेषण केले की, युवावर्ग उत्तेजनात्मक कार्ये व हिंसात्मक कार्याकडे लवकर आकर्षित होताना आपणास दिसतो. युवक वर्गातील वैयक्तिक असमायोजन वाढत असुन त्यामुळे तो आक्रमक बनत चाललेला दिसत आहे.

१२. हेरेन्कोल व इतर — या मानसशास्त्रज्ञानी त्यांच्या अध्ययनामध्ये असे निर्देशनास आले की, जे युवक वर्ग जोखमीच्या वातावरणात मोठे होतात आणि ते आक्रमक गुन्हेगारी कार्यवाहीमध्ये इतरांच्या तुलनेज जास्त प्रमाणात दिसतात.

१३. वळवी, पदमाकर, माजी मंत्री क्रिडा व युवककल्याण — यांनी अये सांगण्यात आले आहे की, युवकांच्या सर्वांगीण विकासात्मक दृष्टीकोन भारत देश हा युवकांच्या देश म्हणुन ओळखला जातो.

राष्ट्राच्या उभारणीतील युवकांचे असलेले महत्व व युवकवर्गाकडे असलेल्या सुप्तगुणना वाव देण्यासाठी विधायक असे व्यासपीठ उपलब्ध करूण देण्यचा नविन युवा धोरणाद्वारे महाराष्ट्र शासनाचा मानस ठरविण्यात आला आहे.

समाजकार्य संशोधन आराखडा

भारतात व्यावसायिक समाजकार्य शिक्षणाची सुरूवात १९३६ ला मुंबई येथिल देवनार येथे टाटा संस्थेत दोरबजी टाटा यांनी केली. या नंतर देश पातळीवर व्यावसायिक समाजकार्य महाविद्यालय स्थापन होताना दिसतात.

समाजकार्यात क्षेत्रकार्यात कार्याला फार महत्व आहे. जगभर पाहताना सुध्दा असे दिसुन येते कि, जगभरात व्यावसायिक समाजकार्य शिक्षण प्रचलित होताना आढळुन येते. आज शासकिय असो अथवा निमशासकिय संस्थाच्या मार्फत समाजकार्याचा विस्तार मोठया प्रमाणात दिसतो.

आज घडीला महाराष्ट्र राज्यात सुध्दा समाजकार्य महाविद्यालयाची संस्था दिवसेंदिवस वाढत असताना दिसत आहे. त्यात मराठवाडाच्या विचार या विभागात सुध्दा समाजकार्याच्या शैक्षणिक संस्था पाहवयास मिळतात. मराठवाडा विभागात आठ महाविद्यालय असुन या अंतर्गत समाजकार्याची शिक्षण दिले जाते.

मी निवडलेल्या संदर्भ क्षेत्राच्या आधारावर विद्यापीठ परिक्षेत्रातील समाजकार्य महाविद्यालयातील प्राध्यापक आणि विद्यार्थी हे माझा विषयाचे उत्तरदाते म्हणुन निवडण्यात ठरविले आहे.

संशोधन समस्या:

व्यावसायिक समाजकार्य शिक्षणामध्ये क्षेत्रकार्य हा भाग महत्वाचा घटक मानला जातो. ता समाजकार्याचा आत्मा संबोधण्यात येतो. पण समाजकार्य शिक्षण पुरविण्यात येणारा शैक्षणिक संस्थेमार्फत क्षेत्रकार्य समाजकार्यात प्रत्यक्ष प्रशिक्षित संस्था पर्यवेक्षक आणि सोबतच समाजकार्यात प्रशिक्षण घेणारा विद्यार्थी सुध्दा क्षेत्रकार्य अध्ययनात कमी पडताना दिसतो.

सैध्दांतिक ज्ञान आणि क्षेत्रकार्य संकल्पना निट समजून घेण्यात कसर पडतो. प्रत्यक्ष क्षेत्रकार्य करताना व्यावसायिक समाजकार्यर्तानें समाजकार्याच्या पध्दती, संकल्पना, तत्वे, मूल्ये, साधण, कौशल्य, तंत्रे, आचारसहिंता, नीतितत्वे व इ. बाबीत विद्यार्थ्यी प्रत्यक्ष क्षेत्रकार्य करताना आढळत नाहीत यामुळे विद्यार्थ्यात व्यक्तिमत्व विकास निर्माण होण्यास अडथळे निमार्ण होतात.

संशोधन विषय:

'समाजकार्य महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्व विकासात क्षेत्रकार्याची भूमिका.'

संशोधन संदर्भ:

माझा संशोधन विषयाचे संदर्भ स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ परिक्षेत्रातील समाजकार्य महाविद्यालय.

संशोधनाचे उद्देश:

भारतात समाजकार्याच्या विद्यार्थ्यांना व्यावसायिक समाजकार्य शिक्षण देण्यात येते. या शिक्षण व प्रशिक्षणाच्या केंद्र बिंदु हा वर्गातील विद्यार्थ्यी मानला जात असतो. वर्गात शिकवणाऱ्या समाजकार्याचे सैध्दांतिक ज्ञान व त्या ज्ञानाच्या प्रत्यक्ष क्षेत्रकार्यात समाजकार्य शास्त्रीय ज्ञानात भर पडताना दिसते. या क्षेत्रकार्याचा प्रक्रिया मुळे विद्यार्थ्यात नविन दृष्टीकोन, कौशल्य, तंत्र,प्रत्येक बाबतीचे नियोजन करणे ह्या सर्व गोष्टीच्या माध्यमातुन त्या विद्यार्थ्यांच्या ज्ञानात व व्यक्तिमत्व विकासात भर पडताना दिसते.

तसेच आज विद्यार्थ्यांना सर्व प्रकारचे सैध्दांतिक व क्षेत्रकार्य प्रात्यक्षिक वर्गात शिकवुण देखिल प्रत्यक्ष अमंलबजवणीत प्रत्यक्ष बाबतीत मात्र कार्यर्त्याकडुन होत नसतात. या कारणामुळे या व्यवसायाचा विस्तार आणि विकास होण्यास सुध्दा फार मोठया प्रमाणात अडथळे निर्माण होऊ लागते.

हे काय व कशामुळे होते ते जाणून घेणयासाठी प्रस्तुत संशोधन कार्य हाती घेतले असून संशोधनासाठी खालील प्रकारे संशोधनकार्याचे उद्देश घेतले आहे.

१. समाजकार्य शिक्षणातील क्षेत्रकार्यामुळे विद्यार्थ्यांच्या झालेल्या व्यक्तिमत्व विकासाचे अध्ययन करणे.

२. समाजकार्य शिक्षणातील क्षेत्रकार्यात विद्यार्थ्यी व पर्यवेक्षक यांच्यातील सहसंबंधाचे अध्ययन करणे.

३. समाजकार्य शिक्षणातील क्षेत्रकार्य करित असताना विद्यार्थ्यांना येणाऱ्या समस्यांचे अध्ययन करणे.
४. समाजकार्य शिक्षणातील क्षेत्रकार्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये झालेल्या वैयक्तिक व सामाजिक बदलाचे अध्ययन करणे.
५. समाजकार्य शिक्षणाच्या सैध्दांतिक आणि प्रत्यक्ष क्षेत्रकार्य यातील संबंधाचा अध्ययन करणे.

विषयाचे गृहितकृत्य:

१. समाजकार्य शिक्षणातील क्षेत्रकार्यामुळे विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्वात विकास झालेला आहे.
२. समाजकार्य शिक्षणातील क्षेत्रकार्यात क्षेत्रकार्य पर्यवेक्षक व विद्यार्थ्यी यांच्यातील साकारात्मक संबंध विद्यार्थ्यांचा व्यक्तिमत्व विकास घडवतो.
३. समाजकार्य शिक्षणातील क्षेत्रकार्य करताना विद्यार्थ्यांना समस्यांशी संघर्ष केल्यामुळे व्यक्तिमत्व विकास घडुन येतो.
४. समाजकार्य शिक्षणातील क्षेत्रकार्यात विद्यार्थ्यांचे वैयक्तिक व सामाजिक बदल सकारात्मक घडुन येतात.
५. समाजकार्य शिक्षणातील क्षेत्रकार्य करताना सैध्दांतिक आणि प्रत्यक्ष क्षेत्रकार्य यातील परिस्थिती वेगळी असते.

अध्ययनाचे विश्व:

संशोधनासाठी संशोधकाने विशिष्ट भौगोलिक क्षेत्राचा अभ्यास करण्यासाठी स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातील समाजकार्य महाविद्यालय हे विश्व आहे.

अध्ययनाचे एकक:

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाअंतर्गत समाजकार्य महाविद्यालयात शिक्षण घेणारे आजी आणि माजी विद्यार्थ्यी, प्राचार्य, प्राध्यापक व क्षेत्रकार्य संस्था यामध्ये कार्यरत कर्मचारी हे अध्ययनाचे एकक आहे.

संशोधनाचे महत्व :

संशोधन ही प्रगतीची अथवा नविन संशोधन निर्माण करण्याची जननी मानली जाते. समाजकार्य संशोधनात सामाजिक घटनांचे / समस्येचे अध्ययन केले जाते. त्या सोबतच संशोधना विषयी उपाययोजना कार्यान्वित केले जाते. समाजकार्य संशोधन केल्याने सत्य परिस्थितीचे ज्ञान प्राप्त होते. आणि त्या संशोधनाच्या समाजाला यथोचित फायदा होताना आपणास दिसतो.

सामाजिक संशोधनातुन संशोधकाला वैयक्तिक, आत्मिक, मानसिक आणि सामाजिक समाधान मिळते. त्या सोबत केलेल्या संशोधनाने समाजातील अज्ञान नष्ट होणे, समाजकल्याण साधणे, सामाजिक प्रगती व नियंत्रण साधणे, यामुळे शासकिय योजनेत या संशोधनाला महत्व व त्याची व्याप्ती वाढते.

१. या विषयाच्या संशोधनातर्गत काढण्यात आलेला निष्कर्षात भारतातील सर्वच विद्यापीठ व समाजकार्य महाविद्यालय क्षेत्रकार्याची रूपरेषा व अभ्यासक्रम ठरविण्यात फायदेशिर होईल.
२. समाजकार्य महाविद्यालयाना अनुदान देणारा महाराष्ट्र शासन, सामाजिक न्याय विशेष सहाय्य विभाग या विभागाला काढलेले निष्कर्ष उपयुक्त ठरते.
३. समाजकार्य महाविद्यालयातील विद्यार्थ्यीच्या व्यक्तिमत्व विकासात क्षेत्रकार्याची भुमिका यावर संशोधन करणारे संशोधक विद्यार्थ्यी व प्राध्यापकांना यांच्या लाभ मिळु शकते.
४. समाजकार्य महाविद्यालयातील क्षेत्रकार्या संदर्भात आधिकाधिक गुणात्मक व दर्जेदार शिक्षण देण्यासाठी विद्यापीठ परिक्षेत्रातील असलेला समाजकार्य महाविद्यालयातील सर्व घटकांना याच्या फायदा मिळु शकतो.
५. या संशोधनाचा विद्यापीठ अनुदान आयोग (U.G.C.) समाजकार्य क्षेत्रकार्याच्या नियमावली, नीतितत्वे, मूल्ये, मार्गदर्शक ठरविण्यासाठी अत्यंत उपयुक्त ठरू शकतो.

संशोधन आराखडा:

प्रस्तुत संशोधन विषयात संशोधकाला समाजकार्य महाविद्यालयातील विद्यार्थ्यीच्या व्यक्तिमत्व विकासात क्षेत्रकार्याची भूमिका या विषयाचा अभ्यास करावयाचा होता म्हणुन संशोधकाने संशोधन करण्यासाठी विश्लेषणात्मक आराखडाची निवड केलेली आहे.

संशोधनात संशोधनकर्ताला संशोधन आराखडा तयार करणे आवश्यक आहे. ज्या संशोधनात संख्यात्मक माहिती संशोधकातुन प्राप्त होतो. अशा वेळी विश्लेषणात्मक आराखडा वापरला जातो.

नमुना निवड पध्दत:

‘समुहाच्या सर्व सदस्याऐवजी त्यांच्यातील एक प्रतिनिधी निवडुन त्याच्याशी संपर्क साधुन माहिती गोळा करणे आणि ती संपुर्ण समूहाची अथवा समग्राची आहे. या पध्दतीला नमुना निवड पध्दत असे म्हणतात’.

प्रस्तुत संशोधन शास्त्रसुध्द पध्दतीने व वेळेत पुर्ण करण्यासाठी संशोधकाने गैरसंभाव्यता नमुना निवड पध्दतीमधील ‘सहेतुक नमुना निवड’ या पध्दतीचा वापर केलेला आहे ही पध्दती निवडण्याचे कारण म्हणजे स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ परिक्षेत्रातील समाजकार्य शिक्षण देणाऱ्या पदवी व पदव्युत्तर सर्व महाविद्यालयाला समान प्रतिनिधीत्व मिळावे याची काळजी घेतलेले आहे.

अध्ययन क्षेत्राशी निगडीत असणारे सर्व व्यावसायिक समाजकार्य महाविद्यालयाशी संबंधीत असलेले संस्थेचे संस्थाचालक, समाजकार्य महाविद्यालयाचे प्राचार्य, प्राध्यापक व विद्यार्थ्यी (आजी/माजी) आहेत. अध्ययनासाठी प्रत्येक महाविद्यालयातुन ०१ संस्थाचालक, प्रत्येक महाविद्यालयातुन ०१ प्राचार्य/ संचालक, प्रत्येक महाविद्यालयातुन ०३ प्राध्यापक,

प्रत्येक महाविद्यालयातुन प्रत्येक वर्गातील १० आजी विद्यार्थ्यी आणि प्रत्येक महावद्यिालयातुन ०५ माजी विद्यार्थ्यी अध्ययनासाठी घेण्यात येतील.

थोडक्यात, समाजकार्य महाविद्यालयातील विद्यार्थ्याचा व्यक्तिमत्व विकासात क्षेत्राकार्याची भूमिका करताना निश्चित संस्था उपलब्ध नसल्याने संशोधकाने सहेतुक नमुना निवड पध्दतीचा वापर करून प्राथमिक तथ्य संकलन करण्यात आले.

तथ्य संकलन:

तथ्य संकलनासाठी समाजकार्य महाविद्यालयातील प्राचार्य, प्राध्यापक, विद्यार्थ्यी (आजी आणि माजी), क्षेत्रकार्य संस्था यांच्यासाठी वेगवेगळे मुलाखत अनुसूची तयार करून तथ्य संकलन करण्यात येईल.

तथ्य विश्लेषण:

तथ्य विश्लेषणासाठी (SPSS), Ms Excel, या संगणकिय प्रणालीचा वापर करून तथ्यांचे विश्लेषण करण्यात येईल.

संशोधन अध्ययनाच्या मर्यादा:

सामाजिक संशोधनात संशोधनाला काही मर्यादा असतात कारण प्रस्तुत संशोधन समुहातील व्यक्ती सोबत केलेले कार्य असते ज्यामध्ये प्रत्येकाचे मत,विचार, प्रतिक्रिया ह्या नैसर्गिक शास्त्राप्रमाणे निश्चित नसतात.

प्रस्तुत संशोधनाच्या मर्यादा ह्या स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ परिक्षेत्रातील येणारी सर्व व्यावसायिक समाजकार्य महाविद्यालय व विद्यापीठातील समाजकार्य शिक्षण देणारे संकुल व संलग्नीत उपकेंद्र या पुरतेच मर्यादित आहेत.

संदर्भ ग्रंथ सुची:

१. आगलावे प्रदिप, २००७, ‘सामाजिक संशोधन पध्दतीशास्त्र व तंत्रे’ नागपूर, श्री साईनाथ प्रकाशन.
२. टांकसाळे प्राजक्ता, २०००, ‘व्यावसायिक समाजकार्य संकल्पना आणि सैध्दांतिक ज्ञान’, नागपूर, श्री. साईनाथ प्रकाशन.
३. पांगुळ–बारहाते, नंदा, २०१०, ‘समाजकार्य विचारधारा सिध्दांत आणि व्यवहार’, नागपूर, आर.बी. प्रकाशन.
४. ताटके, नीलम, २००८ ‘समाजकार्य कोश’ पुणे, डायमंड पब्लिकेशन्स.
५. मेश्राम सुरेश, २००७. ‘समाजकार्यात क्षेत्रकार्य सराव’ नागपूर, यश प्रकाशन.
६. Bet & Other, 2005 “ Field Work Manual” Solapur, Walchand College of Social Work-
७. Bhanti, R., 1996, “Field Work in Social Work Perspective”, Delhi, Himanshu Publications.
८. आंबेडकर, बी., आर., विद्यार्थ्यांनो जागृत व्हा, सुगत प्रकाशन, नागपूर, २०१०.
९. कुलकर्णी, के., वि., व्यक्तिमत्व विकास, श्री. विद्याभारती प्रकाशन, लातुर, २०१६.
१०. सुर्यवंशी, शरद, व्यक्तिमत्व विकासाकरिता खेळ: प्रभावी माध्यम, Review of Research Volume -2 Issue-5, 2013 ISSN: 2249-894X www.ibp.world.

नियोजित प्रकरणे

प्रकरण पहिले

अ) प्रस्तावणा

ब) साहित्य पुर्नवलोकन

प्रकरण दुसरे

अ) समाजकार्य संशोधन आराखडा

ब) स्वा.रा.ती.म. विद्यापीठाची पार्श्वभूमी

प्रकरण तिसरे

तथ्याचे संकलन व विश्लेषण

प्रकरण चौथे

निष्कर्ष, सारांश, गृहित कृत्याची पडताळणी, समाजकार्य प्रारूप व सुचना

प्रकरण पाचवे

परिष्टिये

अ) संदर्भ ग्रंथ सुची

ब) मुलाखत अनुसूची

संशोधक विद्यार्थी
शिरसे बुध्दभुषण माधवराव
जवाहरलाल नेहरू समाजकार्य
महाविद्यालय व संशोधन केंद्र,
सिडको, नविन नांदेड.

मार्गदर्शक
डॉ. आसिफोद्दिन ऐनोद्दिन शेख
सहाय्यक प्राध्यापक
जवाहरलाल नेहरू समाजकार्य
महाविद्यालय व संशोधन केंद्र, सिडको,
नविन नांदेड.